# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 14 March 2024
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक – १४ मार्च २०२४ सायंकाळी ६.१०

****

- पंतप्रधान स्वनिधी योजने अंतर्गत एक लाख फेरीवाल्यांना कर्ज वितरण, पंतप्रधान नरेंद्र मोदींची उपस्थिती
- एक देश एक निवडणूक समितीचा अहवाल राष्ट्रपतींकडे सादर
- अश्लील आणि असभ्य आशय प्रसारित करणाऱ्या ओटीटी मंचावर केंद्र सरकारचा कायद्याचा बडगा, १९ वेबसाईट, ५७ सोशल मीडिया खात्यांचं प्रसारण रोखलं
- राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटानं प्रचारात शरद पवार यांचं नाव आणि छायाचित्र वापरू नये, सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

आणि

- मुंबईनं पुन्हा जिंकला रणजी करंडक, ४२ वेळा कोरलं चषकावर नाव

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज दिल्लीतल्या जवाहरलाल नेहरू स्टेडियमवर आयोजित कार्यक्रमात 'पंतप्रधान स्वनिधी' योजनेच्या लाभार्थ्यांना संबोधित करणार आहेत. यावेळी ते दिल्ली मेट्रोच्या चौथ्या टप्प्यातल्या दोन अतिरिक्त कॉरिडॉरची पायाभरणीही करणार आहेत. 'पंतप्रधान स्वनिधी योजना' कोरोना काळात १ जून २०२० साली सुरू करण्यात आली होती. या योजनेअंतर्गत आज दिल्लीतल्या ५ हजार फेरीवाल्यांसह एक लाख इतर फेरीवाल्यांनाही कर्ज वितरित केली जाणार आहेत. आतापर्यंत देशभरात ६२ लाखांहून अधिक फेरीवाल्यांना १० हजार ९७८ कोटी रूपयांहून अधिक जास्त रकमेची कर्ज वितरित करण्यात आली आहेत.

****

केंद्र सरकारने एक देश एक निवडणूक यावर अभ्यास करण्यासाठी स्थापन केलेल्या समितीनं आज आपला अहवाल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे सोपविला. आपल्या १८ हजार ६२६ पानांच्या अहवालात या समितीनं एक देश एक निवडणूक घेण्याच्या दृष्टीने कायद्यात ४४ सुधारणा करण्यासंदर्भात सुचवलं आहे. या अहवालात सर्व संबंधित पक्ष आणि तज्ज्ञांशी झालेल्या विस्तृत चर्चा आणि १९१ दिवसांच्या संशोधनाच्या निष्कर्षांचा समावेश असल्याची माहिती कायदा आणि न्याय मंत्रालयानं दिली आहे. देशाचे माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती स्थापन करण्यात आली होती. रामनाथ कोविंद यांनी राष्ट्रपतींकडे अहवाल सोपविला त्यावेळी देशाचे गृहमंत्री अमित शहा, कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल हे देखील उपस्थित होते.

****

सी ए ए म्हणजे नागरीकत्व सुधारणा कायदा हा नागरिकत्वाचे अधिकार देणारा असून कोणाचेही अधिकार काढून घेण्यासाठी केलेला नाही असं गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. एका वृत्त संस्थेला मुलाखत देताना त्यांनी सांगितलं की, या कायद्यामुळे अफगाणिस्तान, बांगला देश आणि पाकिस्तानातून आलेल्या स्थलांतरित हिंदू, बौद्ध, जैन, शीख, ख्रिस्ती आणि पारसी शरणार्थींना भारताचं नागरिकत्व मिळेल. या स्थलांतरीत नागरिकांचा समावेश भारतीय नागरिकांमध्ये करुन घेतला जाणार असून ते निवडणूक लढवून लोकप्रतिनिधीही होऊ शकतील. एनआरसी म्हणजे नागरिकांची राष्ट्रीय नोंदणी आणि सीएएचा काहीही संबंध नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं. अल्पसंख्याकांनी या कायद्यामुळे घाबरुन जाण्याचं काहीच कारण नसून या कायद्यात कोणाचंही नागरिकत्व काढून घेण्याची तरतूद नाही. भारतात १५ ऑगस्ट १९४७ ते ३१ डिसेंबर २०१४ या काळात आलेल्या कोणत्याही नागरिकांचे स्वागत असल्याचंही त्यांनी यावेळी सांगितलं.

****

सातत्याने अश्लील आणि असभ्य आशय प्रसारित करणाऱ्या १८ ओटीटी मंचांवर केंद्र सरकारने कायद्याचा बडगा उगारला आहे. केंद्रीय माहिती प्रसारण मंत्रालयानं आज कठोर कारवाई करीत अशाप्रकारे आक्षेपार्ह माहिती देणाऱ्या १९ वेबसाईट, १० ॲप आणि ५७ सोशल मीडिया खात्यांवर बंदी घातली आहे. या सर्वांचं प्रसारण आजपासून मंत्रालयानं रोखलं आहे. माहिती आणि तंत्रज्ञान कायदा २०००

च्या तरतुदींनुसार, इतर मंत्रालयं, माध्यम आणि मनोरंजन क्षेत्र तसंच महिला आणि बाल हक्कांशी संबंधित तज्ज्ञांशी सल्लामसलत करून मंत्रालयानं हा निर्णय घेतला.

****

काँग्रेस सरकारचे आणि आपले दरवाजे सदैव शेतकरी आणि सर्वसामान्यांसाठी खुले असल्याचं काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सांगितलं. भारत जोडो यात्रेदरम्यान आज नाशिक जिल्ह्यातील चांदवड इथं जाहीर सभेला ते संबोधित करत होते. कांद्याचा मुद्दा शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. मात्र, केंद्र सरकार या मुद्यावर मौन बाळगून असल्याचा आरोपही राहुल गांधी यांनी यावेळी केला. इंडिया आघाडीचं सरकार आल्यावर शेतकऱ्यांना जीएसटीमधून वगळण्याचं तसंच, पीक वीमा योजनेची पुनर्रचना करण्याचं त्यांनी आश्वासन दिलं.

या शेतकरी मेळाव्याला राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ काँग्रेस पक्ष नेते बाळासाहेब थोरात आदी उपस्थित होते.

****

नवमतदारांसाठी, मेरा पहला वोट देश के लिए, हे मतदार जागरूकता अभियान सरकारने सुरु केलं आहे. प्रसिद्ध अभिनेता सुबोध भावे यांनी सर्व नवमतदारांना मतदान करण्याचं आवाहन केलं आहे.

****

सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४ च्या निवडणुकीमध्ये मतदान टक्का वाढावा या दृष्टीन आज सांगली जिल्ह्यातील विविध ठिकाणी मतदान विषयक जनजागृती मोहीम राबविण्यात आली. कवठेमहांकाळ शहरात महिला मेळावा, तर मौजे केरेवाडी इथं मतदार जागृती विषयी कार्यक्रम घेण्यात आला. तासगाव तालुक्यातील मौजे बलगवडे इथल्या जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांच्या वार्षिक संमेलन प्रसंगी उपस्थित नागरिकांचं मतदानाबाबत प्रबोधन करण्यात आलं.

दरम्यान, आज धुळे शहराच्या मोहाडी उपनगरातील श्री पिंपळादेवी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयात मतदान जनजागृती अभियानांतर्गत कार्यक्रम घेण्यात आला.

****

राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटानं शरद पवार यांचं नाव आणि छायाचित्र वापरू नये, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं दिले आहेत. अजित पवार गट हा प्रचारासाठी शरद पवार यांचं छायाचित्र आणि नाव वापरत असल्याच्या विरोधात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षानं दाखल केलेल्या याचिकेच्या सुनावणी दरम्यान सर्वोच्च न्यायालयानं हे आदेश दिले. अजित पवार गट हा निवडणूक आल्यावर शरद पवार यांचं नाव वापरतो, मात्र निवडणूक नसतांना त्यांना त्यांची गरज वाटत नाही. आता जर तुम्ही स्वतःचं स्वतंत्र अस्तित्व निर्माण केलं आहे तर तेच पुढे सुरू ठेवावं, अशी टिप्पणीही न्यायालयानं केली. या संदर्भात अजित पवार गटाला दोन दिवसांत प्रतिज्ञापत्र सादर करायला सांगितलं असून या संदर्भातील पुढची सुनावणी १९ मार्चला होणार आहे.

****

रणजी करंडक स्पर्धेत मुंबईनं अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वाखाली विजय साकारत विक्रमी बेचाळीसावं विजेतपद पटकावलं. मुंबई संघानं अंतिम सामन्यात विदर्भाचा १६९ धावांनी पराभव केला. मुंबई संघाने दिलेल्या ५३८ धावांच्या आव्हानासमोर विदर्भाने चांगली झुंज देत ३६८ धावा केल्या. दुसऱ्या डावात शतकी खेळी करणारा आणि दोन बळी टिपणारा मुशीर खान सामनावीर ठरला. तर, स्पर्धेत पाचशेपेक्षा अधिक धावा आणि २९ बळी अशी कामगिरी करणारा तनुष कोटीयन मालिकावीर ठरला.

****

नागपूर हे देशाच्या केंद्रस्थानी असून, मल्टी मॉडल लॉजिस्टिक पार्क आणि सिंदी रेल्वे ड्राय पोर्ट अशा प्रकल्पाच्या माध्यमातून, देशाचं लॉजिस्टिक कॅपिटल होण्याची क्षमता नागपुरात आहे, असं प्रतिपादन, केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज केलं. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या नॅशनल हायवे, वर्ध्याच्या सिंदी रेल्वे इथल्या ड्रायपोर्ट आणि मल्टी मॉडेल लॉजिस्टिक पार्क इथं रेल्वे टर्मिनल सेवांच्या संचालन परीक्षणाचा प्रारंभ, आज नितीन गडकरी यांच्या हस्ते झाला, त्यावेळी ते बोलत होते.

वर्ध्याच्या सिंदी रेल्वे येथील ड्रायपोर्टच्या माध्यमातून विदर्भातील कापूस, कपडा, संत्रा, हे कोलकत्त्याच्या हल्दिया मार्गे बांग्लादेशच्या नदीतून थेट बांग्लादेशला जातील. यामुळे प्रति कंटेनर दीड लाख रुपये असलेला वाहतूक खर्च हा एक लाख रुपयांवर येईल आणि विदर्भातील शेतकऱ्यांना याचा फायदा होईल. तसंच या

भागात उद्योगाला चालना मिळून रोजगार निर्मिती होईल असं गडकरी यांनी याप्रसंगी बोलतांना स्पष्ट केलं.

****

मूत्रपिंडाचं आरोग्य आणि आजारांविषयी जनजागृतीसाठी आज वर्ल्ड किडनी डे पाळला जात आहे. 'सर्वांसाठी मूत्रपिंडाचं आरोग्य', ही यंदाची संकल्पना आहे. किडनी, अर्थात मूत्रपिंडाचं आरोग्य आणि त्याच्या सर्वसामान्य कार्यावर विपरीत परिणाम करणाऱ्या रोगांविषयी जागृती निर्माण करण्यासाठी दरवर्षी मार्च महिन्याचा दुसरा गुरुवार वर्ल्ड किडनी डे म्हणून पाळला जातो.

****

नंदूरबार जिल्ह्यातल्या धडगांव तालुक्यातील आदिवासी पाड्यांवरील १५३ कुटुंबियांना लंडन इथल्या व्हेल्स ऑन व्हील्स संस्थेमार्फत आधुनिक पद्धतीच्या पाण्याच्या ड्रमचं वाटप करण्यात आलं आहे.

खडतर भागात देखील जमिनीवर चाकांच्या सहाय्याने सहज चालणाऱ्या या ड्रम मधून पाणी ने आण करण्यासाठी महिलांना सुकर होणार असून पाण्यासाठी महिलांची २ ते ३ किलोमीटरची पायपीट आणि त्रास वाचणार आहे.

****